दिनांक :  . १.२०१९

**प्रति,**

**मा. परिवहन मंत्री,**

**आंध्रप्रदेश**

**विषय : मकरसंक्रांतीनिमित्त होणारी रेल्वे आणि बस यांच्या तिकिटांमधील दरवाढ, तसेच रेल्वे प्लॅटफॉर्मच्या तिकीटांमध्ये होणारी दरवाढ त्वरित रहित करण्याविषयी....**

महोदय,

माघ मेळा हा हिंदूंचा सर्वांत मोठ्या धार्मिक उत्सवांपैकी एक आहे. प्रत्येक वर्षी माघ महिन्यात म्हणजेच मकरसंक्रांतीपासून ते महाशिवरात्रीपर्यंतच्या काळात पुष्करालू येथील मेळ्यासाठी लाखो भाविक श्रद्धेने येत असतात. या माघ मेळ्याच्या निमित्ताने आंध्र प्रदेश शासनाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करणाऱ्यांसाठी अतिरिक्त शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे.

१. आंध्र प्रदेश येथील साऊथ सेंट्रल रेल्वे प्रशासनाने मकरसंक्रांतीच्या काळातील गर्दी आणि शबरीमला येथील भाविकांची गर्दी यांमुळे प्लॅटफॉर्म तिकिट १० ते २० रुपयांनी वाढवण्यात आले आहे. तसेच भाविकांच्या सोयीसाठी विशेष रेल्वे आणि बसगाड्या यांची व्यवस्था करण्यात येणार असून यांच्यासाठी अनुमाने ३० ते ५० टक्के भाडेवाढ करण्यात आली आहे.

२. शासन एकीकडे हज येथे धार्मिक यात्रा करण्यासाठी मुसलमान बांधवांना शेकडो कोटी रुपयांची सवलत देत अल्प खर्चात विमानप्रवासाची सोय, विशेष वैद्यकीय सुविधा आणि त्यांना सरकारी खर्चाने पर्यायाने बहुसंख्यांक हिंदूंच्या कररूपाने जमा झालेल्या पैशाने हज हाऊस बांधून देते. दुसरीकडे हिंदूंच्या सणांच्या आणि धार्मिक उत्सवांच्या काळात अशी भाडेवाढ करणे, अधिभार लावणे असे प्रकार केले जात आहेत. हे अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह आहे.

३. ‘धर्मनिरपेक्ष’ म्हणवल्या जाणाऱ्या या शासनप्रणालीत सर्व धर्मांना समान न्याय मिळावा, असे अपेक्षित असतांना हिंदूंच्या बाबतीत मात्र नेहमी भेदभाव केला जातो, परिणामी हिंदु समाजाच्या मनात अन्यायाची भावना निर्माण होत आहे.

रेल्वे प्रशासन आणि राज्य परिवहन खाते यांनी घेतलेल्या या भाडेवाढीच्या निर्णयाचा लाखो भाविकांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे. हा निर्णय म्हणजे धार्मिक पक्षपात असून जाणीवपूर्वक हिंदूंच्या धार्मिक उत्सवावर बंधने आणण्याचा प्रकार असल्याची भावना हिंदु समाजामध्ये निर्माण झाली आहे.

**यासाठी आम्ही पुढील मागण्या करत आहोत –**

१. शासनाने माघ मेळा आणि मकरसंक्रांतीच्या निमित्ताने केलेली दरवाढ तातडीने मागे घ्यावी.

२. या धार्मिक उत्सवांच्या ठिकाणी भाविकांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

३. भारतीय नागरिकांना धर्माच्या आधारे सुविधा न देता, सर्व नागरिकांना समान सुविधा मिळाव्यात, समान अधिकार मिळावेत, यासाठी देशात ‘समान नागरी कायदा’ लागू करावा.

या मागण्यांसाठी.... या दिवशी ... या ठिकाणी ‘राष्ट्रीय हिंदू आंदोलन’ करण्यात आले.

आपला नम्र,

संपर्क –

प्रत – मा. रेल्वेमंत्री, केंद्र सरकार, देहली.